## BOMBAY ACT No. X OF 1957.

## THE HYDERABAD AGRICULTURAL DEBTORS RELIEF (BOMBAY AMENDMENT) ACT, 1957.

मुंबई विधानमंडळाच्या पुढील अधिनियमास राज्यपाल यांची संमति तारीख २९ मार्च १९५७ रोजीं मिळालेली असल्यामुळें तो यावरून सर्व लोकांच्या माहितीसाठीं प्रसिद्ध करण्यांत येत आहे.

एन्. के. द्रविड,
मुंबई सरकारचे सचिव, विधि विभाग.

## BOMBAY ACT No. X OF 1957.

## AN ACT FURTHER TO AMEND THE HYDERABAD AGRICULTURAL DEBTORS RELIEF ACT, 1956.

## सन १९५७ चा मुंबईचा अधिनियम १० वा.

[राज्यपाल यांची संमति मिळाल्यानंतर "मुंबई राजपत्रांत" तारीख ३० माहे मार्च सन १९५७ रोजीं प्रथम (इंग्रजींत) प्रसिद्ध केलेला.]

## हैद्राबाद कृषिक ऋणको सहाय्यता अधिनियम, १९५६ सुधारण्याबाबत अधिनियम.

ज्याअर्थीं, हैद्राबाद कृषिक ऋणको सहाय्यता अधिनियम, १९५६ हा, यांत यापुढें दिलेल्या कारणासाठीं सुधारणें इष्ट आहे ; त्याअर्थीं, भारतीय गणराज्याच्या आठव्या वर्षी यावरून पुढें लिहिल्याप्रमाणें अधिनियम करण्यांत येत आहे :—

१. या अधिनियमास हैद्राबाद कृषिक ऋणको सहाय्यता (मुंबई सुधारणा) अधिनियम, १९५७, असें म्हणावें. लघु संज्ञा.

२. हैद्राबाद कृषिक ऋणको सहाय्यता अधिनियम, १९५६ याच्या ४ थ्या कलमांत, पोट-कलम (१) ऐवजीं पुढील सजकूर दाखल करण्यांत यावा :— सन १९५६चा हैद्राबादचा अधिनियम १६ वा याचें कलम ४ याची सुधारणा.

"(१) मुंबई राज्याच्या हैद्राबाद विभागांतील कोणत्याहि स्थानिक हद्दींत सामान्यपणें राहणारा कोणताहि ऋणको किंवा त्याच्या धनको यास, तारीख ३१ मे १९५७ रोजीं किंवा त्या तारखेपूर्वीं त्याच्या कर्जांच्या तोडजोडीसाठीं न्यायालयाकडे अर्ज करण्याचा अधिकार आहे.".

३. सन १९५७ चा हैद्राबाद कृषिक ऋणको सहाय्यता (मुंबई सुधारणा) अध्यादेश हा यावरून रद्द करण्यांत येत आहे. सन १९५७चा मुंबईचा अध्यादेश १ हा रद्द करणें.

(True translation)
D. T. MUZUMDAR,
Examiner of Books and Publications, Bombay.

**BOMBAY ACT No. XI OF 1957.**

## THE HYDERABAD AGRICULTURAL INCOME-TAX (AMENDMENT) ACT, 1947.

मुंबई विधानमंडळाच्या पुढील अधिनियमास राज्यपाल यांची संमति तारीख २९ मार्च १९५६ रोजीं मिळालेली असल्यामुळें तो यावरून सर्व लोकांच्या माहितीसाठीं प्रसिद्ध करण्यांत येत आहे.

एन्. के. द्रवीड,
मुंबई सरकारचे सचिव, विधि विभाग.